**ठळक बातम्या**

- प्रयागराजमध्ये कुंभमेळ्यात चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू, ९० जण जखमी, मृतांच्या कुटुंबांना उत्तर प्रदेश सरकारकडून २५ लाख रुपयांची मदत जाहीर

- राष्ट्रीय महत्त्वपूर्ण खनिज अभियानाला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी उद्या सर्वपक्षीय बैठक

- वक्फ सुधारणा विधेयकाविषयी नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीचा मसुदा अहवाल मंजूर

**आणि**

- 'इस्रो'नं केलं उपग्रह घेऊन जाणाऱ्या शंभराव्या अग्निबाणाचं यशस्वी प्रक्षेपण

<><><><><>

उत्तरप्रदेशामध्ये प्रयागराज इथं महाकुंभात आज मौनी अमावस्येनिमित्त आयोजित अमृत स्नानाच्या दरम्यान चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू झाला आणि ९० जण जखमी झाले. महाकुंभचे पोलीस उप महानिरीक्षक वैभव कृष्णा यांनी वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. मध्यरात्री भाविकांची प्रचंड गर्दी असल्यामुळे गडबड झाली, बॅरिकेट्स तुटल्यामुळे रस्त्यावर झोपलेले भाविक इतर भाविकांच्या पायाखाली येऊन जखमी झाले असं कृष्णा यांनी सांगितलं. जखमी झालेल्या ९० जणांना रुग्णालयात नेण्यात आलं होतं, त्यातल्या तीस जणांचा मृत्यू झाला आहे. उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सर्व आखाड्यांच्या महामंडलेश्वर आणि संतांशी चर्चा केली असून सर्व भाविकांची काळजी घेतली जात आहे, असंही त्यांनी सांगितलं.

प्रयागराज इथल्या महाकुंभात झालेली चेंगराचेंगरीची घटना दुर्दैवी असून त्यामध्ये जीवित हानी झालेल्या भाविकांच्या नातलगांप्रती शोक संवेदना व्यक्त करत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मृतांना आदरांजली वाहिली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाकुंभ इथं झालेल्या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

प्रयागराजमधल्या दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत उत्तर प्रदेश सरकारने जाहीर केली आहे. याप्रकरणी ३ सदस्यीय न्यायालयीन चौकशीची घोषणा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केली. उद्या राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक प्रयागराजमध्ये जाऊन परिस्थितीचा आढावा घेतील. यापुढे अशा दुर्घटना होऊ नये यासाठी खबरदारी घेतली जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रीय महत्त्वपूर्ण खनिज अभियानाला केंद्रसरकारने मंजुरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रसारमाध्यमांना सांगितलं की या मोहिमेकरता ३४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद करण्यात आली आहे. प्रदूषण न करणारं हरित तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी या महत्त्वपूर्ण खनिजांचा अखंडित पुरवठा आवश्यक असून कृषी, संरक्षण, वाहतूक, अणु उर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, एअरोस्पेस अशा विविध क्षेत्रांना या निर्णयामुळे फायदा होणार आहे. महत्त्वाच्या खनिजांची आयात कमी करुन देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी अधिक उत्खनन आणि खाणींचं अधिग्रहण करण्याच्या उद्देशाने हे अभियान सुरु केलं आहे.

ऊसापासून काढलेल्या इथेनॉलच्या खरेदीसाठीचे हमीदरही आजच्या बैठकीत मंजूर झाले. त्यात सी दर्जाच्या मळीपासून काढलेल्या इथेनॉलकरता ५७ रुपये ९७ पैसे आणि बी दर्जाच्या मळीपासून काढलेल्या इथेनॉल करता ६० रुपये ७३ पैसे प्रति लीटर दर जाहीर झाला आहे. ऊसाचा रस, साखर आणि साखरेच्या सिरप पासून मिळणाऱ्या इथेनॉल करता ६५ रुपये ६१ पैसे प्रतिलीटर दर जाहीर झाला आहे. इंधनात इथेनॉल मिसळल्यानं एकलाख १३ हजार कोटी रुपये मूल्याच्या परदेशी चलनाची बचत होत असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सरकारने उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन शुक्रवारपासून सुरू होणार आहे. शुक्रवारी आर्थिक पाहणी अहवाल सादर होईल. शनिवारी १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर करतील.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयक २०२४च्या संयुक्त संसदीय समितीचा अहवाल आज मंजूर करण्यात आला. समितीमधल्या १४ दुरुस्त्या स्वीकारल्याचं समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी वार्ताहरांना सांगितलं. हा अहवाल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना उद्या सादर केला जाणार आहे. गेले सहा महिने या अहवालावर सखोल चर्चा झाल्याचं जगदंबिका पाल यांनी सांगितलं. देशभरात वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन आणि नियमन सुधारणं हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे.

दरम्यान, विरोधी पक्षातल्या सदस्यांनी या अहवालावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. हा अहवाल घाईघाईत स्वीकारल्याचं द्रमुकचे नेते डी. राजा म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत आणि तृणमूल काँग्रसचे कल्याण बॅनर्जी यांनी अहवालाच्या विरोधात मतदान केलं.

<><><><><>

नवी दिल्लीतल्या विजय चौकात आज बिटींग रिट्रीट समारोह पार पडला. समारंभाची सुरुवात कदम कदम बढाए जा या ऐतिहासिक गाण्याने झाली. त्यानंतर अमर भारती, इंद्रधनुष्य, जय जन्म भूमी आणि वीर सियाचीन यासारख्या गाण्यांच्या सुरांनी समारोह सजला. यंदाच्या बिटींग रिट्रीट सोहळ्यात लष्कर, नौदल, हवाई दलाच्या बँडनी सादरीकरण केलं.

सोहळ्याचा शेवट सारे जहाँ से अच्छा या लोकप्रिय गाण्याच्या सुरांनी झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उप राष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

यंदाच्या प्रजासत्ताकदिनी कर्तव्यपथावरच्या संचलनात सहभागी झालेल्या चित्ररथांमधे उत्तर प्रदेशचा महाकुंभ २०२५- स्वर्णिम भारत विरासत और विकास हा चित्ररथ सर्वोत्कृष्ट ठरला आहे. त्रिपुरामधल्या १४ देवतांची खार्ची पूजेची परंपरा दाखवणाऱ्या चित्ररथाला दुसरं तर पर्यावरण स्नेही लाकडी खेळण्यांचं महत्त्व चित्रित करणाऱ्या आंध्र प्रदेशच्या चित्ररथाला तिसरं पारितोषिक मिळालं आहे.

केंद्रसरकारच्या विविध मंत्रालयांपैकी आदिवासी विकास मंत्रालयाच्या पारितोषिक मिळालं आहे. संचनलात सहभागी झालेल्या सैनिकी तुकड्यांमधे जम्मू काश्मीर रायफलच्या पथकाला सर्वोत्कृष्ट संचलनाचं बक्षीस मिळालं. निमलष्करी आणि सुरक्षा दलांच्या तुकड्यांमधे दिल्ली पोलिसांच्या तुकडीला बक्षीस मिळालं. केंद्रसरकारच्या मायगोव्ह पोर्टलवर मिळालेल्या अभिप्रायाच्या आधारे गुजरातच्या

चित्ररथाला विशेष पारितोषिक मिळालं, तल सर्वोत्कृष्ट संचलनाचं बक्षीस सिग्नल्स पथकाला मिळालं.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आज काँग्रेस पक्षानं जाहीरनामा प्रसिद्ध केला. दिल्ली प्रदेश काँग्रेसच्या कार्यालयात झालेल्या वार्ताहर परिषदेत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी जाहीरनाम्याविषयी माहिती दिली. हा जाहीरनामा जय बापू, जय भीम आणि जय संविधान या संकल्पनेवर आधारित असल्याचं ते म्हणाले. काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्यास महिलांना दरमहा अडीच हजार रुपये तसंच, ५०० रुपयांत गॅस सिलिंडर, मोफत धान्य, सर्वांसाठी २५ लाखांचा वैद्यकीय विमा, बेरोजगार तरुणांना अडीच हजार रुपयांचं विद्यावेतन, ३०० युनिटपर्यंत मोफत वीज अशी आश्वासनं या जाहीरनाम्यात दिली आहेत.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज शाहदरा मतदारसंघातल्या कर्तार नगर इथं जाहीर सभा घेतली. आम आदमी पार्टीने दिल्लीकरांना खोटी आश्वासनं दिली आहेत, अशी टीका मोदी यांनी या सभेत केली. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनीही आज बदरपूर इथं जाहीर सभा घेतली. आम आदमी पार्टीचे समन्वयक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी बादली आणि तिमारपूर भागात जाहीर सभेला संबोधित केलं. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी राजौरी, टिळक नगर आणि विकासपुरी परिसरात रोड शो केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपाचे स्टार प्रचारक असून पुढचे तीन दिवस ते दिल्ली दौऱ्यावर आहेत.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इस्रोनं एन व्ही एस झिरो टू या उपग्रह घेऊन जाणाऱ्या अग्निबाणाचं यशस्वी प्रक्षेपण केलं. जीएसएलव्ही एफ - 15 हा प्रक्षेपक आज पहाटे सहा वाजून २३ मिनिटांनी श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून सोडण्यात आला. इसरोतर्फे झालेलं हे शंभरावं अग्निबाण उड्डाण होतं. एनव्हीएस ओ टू हा उपग्रह त्याच्या कक्षेत स्थिरावला असून तो दूरसंचार, दिशादर्शन आणि हवामान शास्त्रासाठी उपयुक्त ठरणार आहे. इस्रोसाठी ही एक ऐतिहासिक कामगिरी आाहे, अशा शब्दात इस्रोचे प्रमुख व्ही. नारायणन यांनी आनंद व्यक्त केला.

**<><><><><>**

धाराशीव जिल्ह्यात बस अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला आणि १६ महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. तुळजापूरला दर्शन घेतल्यानंतर खासगी बसद्वारे या महिला परत निघाल्या होत्या. तेव्हा सोलापूर घाटात हा अपघात झाला. जखमींवर धाराशिवमध्ये उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

सायबर फसवणुकीसाठी बँक खातं पुरवणाऱ्या सहा जणांच्या टोळीला पिंपरी चिंचवड सायबर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी झारखंड, गुजरात, ओदिशा या राज्यातील असून त्यांनी कंबोडियातील एकाला हजारो बँक खाती पुरवल्याचं उघड झालं आहे. एका गुन्ह्याच्या तपासात एक जणाला ताब्यात घेतलं असता तो बँक खातं पुरवण्याच्या प्रकारात सहभागी असल्याचं आढळून आलं. त्याची अधिक चौकशी केली असता या टोळीचा तपास लागला.

**<><><><><>**

पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमची रुग्णसंख्या वाढल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं नेमलेल्या उच्चस्तरीय पथकानं आज पुण्यातल्या परिस्थितीचा आढावा घेतला. पथकानं ससून सर्वोपचार रुग्णालयाला भेट देऊन, रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांसोबत बैठक घेतली.

**//<><><><><>//**